महापारेषण

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी पारेषण कंपनी मर्यादीत

अउदा स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था विभाग ,जळगाव ४२५००३

---

जा.कं.काअ/स्थापत्य /तांत्रीक /जळगाव /No 633 दिंनाक ः- 16 OCT 2020

e- Quotation – on web-site of MSETCL [3rd Call]

प्रति ,

-----------------

-----------------

-----------------

विषय ः अउदा स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था उपविभाग धुळे ०१ साठी टॅक्सी परमीट असलेले प्रवासी वाहन (डिझेल) भाडयाने घेणेबाबत.

महोदय ,

वरील विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादीत अउदा स्थापत्य बांधकाम तथा सुव्यवस्था उपविभाग धुळे १ साठी परमीट असलेले प्रवासी वाहन (डिझेल) भाडयाने घेण्यासाठी जाहिर कोटेशन मागविण्यात येत आहेत त्यांचा संपुर्ण तपशिल व अटी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क | तपशिल | प्रत्येक दिवसाचा भाडयाने देण्याचा दर | वाहन भाडयाने घेण्याचा कालावधी प्रत्यक्ष वाहन चालल्याचे दिवस | रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | परमीट असलेले प्रवासी वाहन (डिझेल) भाडयाने देणेबावत सदर वाहन सन २०१६ किंवा त्यानंतरचे असावे प्रत्येक महिन्याला वाहनाचा वापर अंदाजे ३००० कि.मी. होईल कमी जास्त वापर झाल्यास कोणताही जादा आकार मिळणार नाही वाहनासाठी लागणारे इंधन ,हायस्पीड डिझेल कंपनीतर्फ पुरविण्यात येईल इधंनाचा वापर सरासरी १८ कि.मी.प्रति लिटर डिझेल (टाटा इंडिकासाठी किंवा तत्सम) पेक्षा कमी नसावा.[AC use सह ]अन्यथा यापेक्षा सरासरी वापर कमी असल्यास म्हणजे इंधनाचा वापर जास्त झाल्यास वरील सरासरी धरून फरकाची रक्कम वीलातुन कपात करण्यात येईल वाहनाचा वापर कमीत कमी १२ तास राहील जास्त वापर झाल्यास कोणताही जादा आकार मिळनार नाही. वाहनासोबत परवानाधारक वाहन चालक पुरवावा लागेल. वाहन चालकाचा पगार व इतर भत्ते तसेच वाहनाचा घसारा व आवश्यक त्या दुरूस्तीचा खर्च व इतर कुठलाही खर्च इंजिन ऑईल व गिअर ऑईलसह कंपनीकडुन देण्यात येणार नाही. | रू.<br>+<br>SGST-9%<br>CGST -9%<br>एकुण दर रू. | २७५ दिवस (कामाचे दिवस) | |

अटी व शर्ती ः -

१. भाडयाने घेण्याच्या वाहनाचे मॉडेल सन २०१६ किंवा त्यानंतरचे व सुस्थितीत असावे. वाहनासाठी आर. टी. ओ. कर. इन्शुरन्स, प्रदुषण नियत्रंण प्रमाणपत्र इ. बाबी परिपुर्ण असाव्यात अन्यथा सदर निवीदा नाकारण्यात येतील.

२. कोटेशन सादर करतांना खालील प्रमाणपत्राच्या प्रमाणीत प्रति सादर कराव्या लागतील.

अ. आर. सी. / टी. सी. बुकची झेरॉक्स प्रत.

ब. आर टी ओ. परवान्याची झेरॉक्स प्रत

क. वैध विमा प्रमाणपत्र झेरॉक्स

ड वार्षीक कर अदा केल्याची पावती

इ वाहनाचे वैध फिटनेस प्रमाणपत्र

इ. प्रदुषण नियत्रंण प्रमाणपत्र झेरॉक्स

ई. वाहनचालकाच्या ड्रायव्हींगची लायसन्सची झेरॉक्स प्रत.

३. सदर वाहानाचा वापर आवश्यकतेनुसार सर्व महाराष्ट्रात होईल.

४. वाहन विद्युत पारेषण कंपनीत कार्यरत असेपर्यत कोठल्याही प्रकारची जोखीम किंवा जबाबदारी कंपनीवर राहणार नाही.

५. मुख्यालय सोडुन जातांना किंवा इतर ठिकाणी वाहन नादुरूस्त झाल्यास पर्यायी वाहनाची व्यवस्था आपणास स्वखर्चाने करावी लागेल अन्यथा ट्रांन्समिशन कंपनीच्या नियमाप्रमाणे किंवा सक्षम अधिकारी ठरवतील त्याप्रमाणेदंड आकारण्यात येईल.

६. वाहनाचा वापर साधरणतः सकाळी ९ ते संध्याकाळी ९ वाजेपर्यंत करण्यात येईल त्याच्या व्यतीरिक्त जर जादा वापर झाल्यास कोणताही जादा आकार कंपनीतर्फ देण्यात येणार नाही.

७. वाहनाची नोंद वहीत रोजच्या रोज वापर केल्याप्रमाणे नोंद घेवुन त्याच्या कंपनीच्या संबधीत अधिकारी किंवा त्याच्या प्रतिनिधीच्या सहया घ्याव्या लागतील व ती नोदंवही बीलासोबत या कार्यालयाकडे सादर करावी लागेल.

८. वाहनाचे बील उपविभागीय कार्यालय धुळे ०१ मध्ये ५ तारखेच्या आत तीन (०३) प्रतीत सादर करावे लागेल बिलाची रक्कम रेखांकीत धनादेशाव्दारे देण्यात येईल. नियमा प्रमाणे आयकराची कपात आपल्या बिलातुन करण्यात येईल. तसेच जी. एस. टी. नोंदणी कमांक असणे आवश्यक आहे.

९. कोटेशन सादर करतांना इसारा रक्कम रूपये ३०००.०० रोख भरणा करणे अनिवार्य आहे इसारा रक्कम न भरल्यास कोटेशन फेटाळण्यात येईल.

१०. ऑडर दिलेल्या तारखेपासुन ऑडरची मुदत संपेपर्यन्त वाहन कंपनीच्या ताव्यात राहील दुरूस्ती सोडुन इतर कोणत्याही कामासाठी कार्यकारी अभियंता (स्था) जळगाव यांच्या पुर्वपरवानगी शिवाय वाहन हलविता येणार नाही.

११. प्रत्येक महीन्याच्या दर रविवार साप्ताहीक सुटी समजुन त्या दिवशी वाहनाचा वापर शक्यतो होणार नाही आकस्मीक कारणावरून / कारणास्तव रविवार सुध्दा वाहनाचा वापर झाल्यास त्या दिवसाचे भाडे देण्यात येईल. तसेच ज्या दिवशी वाहन वापरले जाणार नाही त्या दिवसाचे भाडे देण्यात येणार नाही.

१२. वाहन भाडयाने देण्याचा कालावधीत जरी २७५ दिवसांचा असलातरी कंपनीचे वाहन उपलब्ध झाल्यास २४ तासाची पुर्वसुचना देवुन बंद करण्यात येईल व वर्क ऑर्डर संपुष्टात आणण्यात येईल व त्याबददल कुठलाही दावा मान्य करण्यात येणार नाही.

१३. वाहानाचा कुठल्याही प्रकारचा आघात किंवा अपघात झाल्यास त्याची जबाबदारी वाहन चालक किंवा वाहन मालकावर राहील कंपनी याबाबत जबाबदार राहणार नाही.

१४. वाहनासंबधी विमा, वाहन परवाना, आर.टी.ओ.प्रवासी परवाना वाहन कर भरल्याचे प्रमाणपत्र , वाहन नोदंणी प्रमाणपत्र व वाहनाची सवर्ध कागदपत्रे पुर्ण असल्याची जवाबदारी आपणावर राहील तसेच सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती झेरॉक्स प्रति सोबत जोडाव्यात वाहनाचे काही कागदपत्रे अपुर्ण राहील्यास तीजबावदारी आपली राहील.आर.टी.ओ च्या नियमावलीचे पालन न झाल्यास विद्युत कंपनी उदभवणा-या प्रसंगास जवाबदार राहणार नाही किंवा कसल्याही प्रकरचा दंड भरणार नाही व आर टी.ओ.नियमावलीचे काटेकोरपणे पालन करण्याचे सर्वस्वी जवाबदारी आपणावर राहील.

१५. वाहन कंपनीच्या सेवेत असंताना झालेल्या कोणत्याही स्वरूपाच्या अपघात संदर्भात कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार सर्व प्रकारच्या नुकसान भरपाईसाठी रक्कम अदा करण्याची जवाबदारी वाहन मालकावर राहील.कंपनी त्यास कोणत्याही प्रकारे जबावदार राहणार नाही.

१६.वाहन चालकाच्या बावतीत अपघात नुकसान भरपाई रक्कम वेतन इ. बावतीत कंपनी जवाबदार राहणार नाही.

१७. सर्व अटी व शर्तीच्या काळजीपुर्वक अभ्यास करावा नंतर कुठलीही सबब व तकार ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१८. आपण मागणी केलल्या दर हे जी.एस.टी सह अंतर्भुत असावा.नियमानुसार लागु होणा-या सर्व प्रकारच्या टॅक्सची कपात आपल्या बीलातुन करण्यात येईल. ( TDS)

१९.या बावतीत सर्व खटले जळगाव न्यायालयाअतंर्गत राहतील.

२०. कोणतीही किंवा सर्व कोटेशन कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार खाली स्वाक्षरी करणा-यांनी राखुन ठेवला आहे.

२१. सदर वाहनाचे संपुर्ण दर नमुद केलेले आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रतिसह सही केलेले व सिलबंद कोटेशन या कार्यालयात दिंनाक २६.१०.२०२० रोजी दुपारी १.०० वाजेपंर्यत स्वतः किंवा प्रतिनिधी मार्फत सादर करावे. पोस्टाव्दारे प्राप्त कोटेशन स्विकारण्यात येणार नाही.दिंनाक २६.१०.२०२० रोजी या कार्यालयात दुपारी १५.०० वाजेनंतर उपस्थित राहु इछिणा-या निविदांकारासमोर उघडण्यात येतील.

आपला विश्वासु ,

कार्यकारी अभियंता (स्थापत्य)
अउदा स्थावांवसु वि.जळगाव

निविदाकाराची सही व शिक्का

पत्ता : ------------------

------------------------

------------------------ Mobile No.---------------

प्रत सविनय सादर :

- अधिक्षक अभियंता ( स्था) स्थापत्य वांधकाम तथा सुव्यवस्था मंडळ ,मराविंपाकं म.नाशिक

प्रत माहितीसाठी

१.अतिरक्ति कार्यकारी अभियंता ( स्था) उपविभाग धुळे १ – As per Requirement Letter from Your Sub-division , this e-quotation is invited....

२.उपव्यवस्थापक (विवले ) जळगाव ३.नोटीस वोर्ड